# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### सहार गावातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर अनिरुद्ध मचाडो याच्या अंगावर नारळाचे झाड पडून मृत्यू झाल्याबाबत

**(१) ३७९२९ (२०-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहार गावातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर अनिरुद्ध मचाडो याच्या अंगावर नारळाचे झाड पडून त्याचा मृत्यू झाल्याची दुःखद घटना दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मृत्यूप्रकरणी महानगरपालिका, एमएमआरडीए, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड यापैकी कुणीही जबाबदारी घेत नाही, त्यामुळे एमएमआरडीए आणि मिआल यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला जावा, अशी मागणी स्थानिक सामाजिक संस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर दुर्घटना घडली आहे तो रस्ता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिसूचित क्षेत्रात आहे. सबब, सदर प्रकरणी श्री.अनिरुध्द मचाडो यांच्या कुटुंबियांना छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. यांच्याकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी विशेष प्रयत्न करण्याचे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषदेमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नगराध्यक्ष पद भरण्याबाबत

**(२) ३९५०० (३१-०३-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपालिकांना ७४ वी घटना दुरुस्ती कायदा १९९२ दिनांक १ जून, १९९३ पासून लागू झाला असून, यात महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जून, १९९३ पासून नगरपरिषदांमध्ये आरक्षण लागू झाल्यानंतर व त्यापुर्वीपासून म्हणजे यवतमाळ नगर परिषदेची स्थापना झाल्यापासून ८६ वर्षात एकदाही अनुसूचित जमाती प्रवर्गाचा उमेदवार नगराध्यक्ष झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ च्या जनगणनेनुसार यवतमाळ नगरपरिषदेची लोकसंख्या २ लाख ४८ हजार ९३९ आहे. या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ३८ हजार २१४, इतर मागासवर्गाची व खुल्या प्रवर्गाची लोकसंख्या १ लाख ९० हजार ९४० आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या १९ हजार ७८५ आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१६ मध्ये यवतमाळ नगरपरिषद क्षेत्रालगतच्या वाघापूर, लोहारा, वडगाव, पिंपळगाव, उमरसरा, भोसा, मोहा या सात ग्रामपंचायती नगरपरिषदेत समाविष्ट झालेल्या आहेत. त्यामुळे नगरपरिषद यवतमाळ मधील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यवतमाळ नगरपरिषदेमध्ये आजपर्यंत वेळोवेळी जाहीर झालेल्या आरक्षणानुसार अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग व खुल्या प्रवर्गाच्या व्यक्ती निवडून नगराध्यक्ष पदावर विराजमान झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, आरक्षण धोरण लागू झाल्यापासून अनुसूचित जमाती प्रवर्गाची व्यक्ती नगराध्यक्ष पदावर नियुक्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, अनुसूचित जमाती प्रवर्गाचे नगराध्यक्ष पद उक्त प्रवर्गाकरीता मिळण्यासाठी शासन स्तरावर याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) अंशतः खरे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार नगरपरिषद यवतमाळ या शहरी भागाची लोकसंख्या १,१६,५५१ इतकी असून, त्यापैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६,५४३ इतकी आहे. त्यानंतर सन २०१६ मध्ये झालेल्या हद्दवाढीनंतर यवतमाळ नगरपरिषदेची एकुण लोकसंख्या ही २,४८,९३९ इतकी झाली असून त्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या १९,७८५ इतकी आहे.
(४), (५) व (६) होय.
(७) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत "जैसे थे" स्थिती ठेवण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर नगराध्यक्ष पदाचे आरक्षण निश्चित करताना लोकसंख्या विचारात घेण्यात येईल.

---

## औसा (जि.लातूर) या शहरातील बाजारपेठ असलेल्या मुख्य रस्त्याचे रुंदीकरणाचे तिसऱ्या टप्प्याचे काम मंजुरीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३) ४२८१७ (२७-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) या शहरातील बाजारपेठ असलेल्या मुख्य रस्त्याचे रुंदीकरणाचे तिसऱ्या टप्प्याचे काम मंजूरीअभावी प्रलंबित असल्याने वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने सदरील रस्त्याचे रुंदीकरण करून रस्त्याचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदय तसेच नगरविकास मंत्री यांच्याकडे दि. ११ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्त्याचे तिसऱ्या टप्प्याच्या रुंदीकरण कामासाठी भूसंपादन व रस्ता कामासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, सदरील रुंदीकरण कामासाठी आवश्यक निधीची तरतूद करून कामास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) माहे डिसेंबर-२०२१ पासून सप्टेंबर-२०२३ पर्यंत वैशिष्ट्यपूर्ण/ ठोक/ विशेष रस्ता योजने अंतर्गत रक्कम रु.३४.०० कोटी निधी औसा नगरपरिषदेस मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील नवनिर्वाचीत नगरपंचायत असलेल्या घुग्घुस नगरपंचायतीतील विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ४३८५६ (२५-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर होऊन १ वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही नगरपंचायतीच्या विकास कामांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवनिर्वाचीत नगरपंचायत असलेल्या घुग्घुस नगरपंचायतीतील विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, नगरविकास मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) घुग्घुस नगर परिषदेस दि.२६.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.४.८० कोटी वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

## बिलोली (जि.नांदेड) येथे वैशिष्टयपूर्ण योजनेतून वाचनालय व अभ्यासकीच्या इमारतीच्या व सौर पथदिव्याच्या निविदांबाबत

**(५) ४३८९४ (२५-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) नगरपरिषदेत वैशिष्टयपूर्ण योजेनच्या अनुदानातून सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका उभारण्यासाठी निविदा आणि सौर पथदिवे लावण्याच्या निविदा मागविण्यात आल्या असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र या निविदा ठेकेदार व प्रशासन यांच्या आर्थिक अवैध तडजोडीत अडकल्या असून, सदरील कामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने यासंदर्भात चौकशी करुन या निविदा मार्गी लावून सदरील कामे तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) बिलोली नगरपरिषद क्षेत्रातील सौर पथदिवे बसविण्याचे काम दि.१२ डिसेंबर २०२१ रोजी तर सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका बांधकाम दि.०३ नोव्हेंबर, २०२२ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

---

## धुळे व नंदूरबार जिल्हयातील ऊसतोड मजूरांच्या समस्यांबाबत

**(६) ४४७४० (२१-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे आणि नंदूरबार जिल्हयातील हजारो मजूर हे पश्चिम महाराष्ट्रात ऊसतोड करण्यासाठी दरवर्षी जातात, उन्हाळयात ४५ ते ४६ अंश तापमानात हे मजूर काम करतात त्यामुळे खान्देशातील अनेक मजूरांना उष्माघाताचा त्रास झाल्याचे माहे एप्रिल व माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मजूर काम करीत असलेल्या ठिकाणी राहण्यासाठी सुरक्षीत जागा नसल्याने सर्प, विंचू या सारख्या विषारी प्राण्यांच्या दंशाने मृत्यु झाल्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऊसतोड मजूरांना साखर कारखान्यांकडून सनकोट, पायात फुलसाईजचे बुट, टोपी तसेच विषारी प्राण्यांपासुन रक्षण व्हावे म्हणून सुरक्षीत ठिकाणी राहण्याची जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) कारखान्यावर मजूर आल्यानंतर या मजूरांना विषारी प्राण्यांपासून संरक्षण व्हावे म्हणुन राहण्याकरिता सुरक्षित जागा उपलब्ध करून दिलेली असुन तिथे लाईट, पिण्याचे पाणी, स्वच्छता केलेली असते तसेच निवाऱ्यासाठी चांगल्या दर्जाचे टेन्ट तयार करण्यासाठी तात्पूरती व्यवस्था म्हणून बांबू, तट्टे इ. बाबी पुरविल्या जातात. काही कारखान्यात ऊसतोड मजूरांच्या वास्तव्यासाठी कायमस्वरूपी सुविधा आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) क्रॉसिंग क्र.७४ बंद करून भुयारी पूलाकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(७) ४६५५० (२८-०९-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपरिषद धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील रेल्वेगेट एलसी ७४ बंद करून पर्यायी व्यवस्थेकरीता भुयारी पुल मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू भुयारी पुलाच्या बांधकामातील रु.१२२४.६६ लक्ष इतकी तरतूद शासन करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धामणगाव रेल्वे क्रॉसिंग क्र.७४ बंद करण्याकरीता भुयारी पुलाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री यांना दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून भुयारी पुलाचे काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) धामणगाव-रेल्वे नगरपरिषदेस सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील तरतूदीतून वैशिष्टयपूर्ण/ ठोक/ विशेष रस्ता योजने अंतर्गत रक्कम रु.१५.१७ कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**राज्यात आर्थिक विकास महामंडळाला निधी मिळणेस होत असलेली दिरंगाई**

**(८) ५१२४३ (२५-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये मराठा, अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक उन्नतीकरिता राज्य शासनाने विविध आर्थिक विकास महामंडळाची स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये वेगवेगळया आर्थिक विकास महामंडळामार्फत निधी दिला जातो, यामध्ये आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, आण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ कार्यरत असून या महामंडळामार्फत नवउद्योजकांना उद्योग, व्यवसाय उभारण्यासाठी कर्ज देऊन उद्योजक निर्माण करण्याचे काम करीत असून मागील काही दिवसांपासून या महामंडळांकडून निधी अभावी प्रकरणे मंजूर होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमध्ये काही जाचक अटी असल्यामुळे मागणी केलेल्या अर्जापैकी केवळ १० ते १५ टक्के प्रकरणे मंजूर होण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, नवीन व्यवसाय करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहणेसाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.महामं-२००४/प्र.क्र.३८/विघयो-२, दिनांक ३० नोव्हेंबर, २००४ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र लाभार्थ्यांना कर्जाचे वाटप करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड–वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मुलभूत सोयी सुविधांच्या कामांस दिलेली स्थगिती उठविण्याबाबत

**(९) ५१६२५ (२२-०१-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मुलभूत सोयी सुविधांच्या सुमारे रु.१५०.०० कोटी इतक्या कामांना शासनाने मान्यता प्रदान केली असून बहुतांश कामे जवळपास पूर्ण होत आली असल्याने शासनाने सदरचा रु.१५०.०० कोटी इतका निधी वितरीतही केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आता शासनाने अनाकलनीयरित्या सदर निधी वाटपास स्थगिती दिली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील मूलभूत सुविधांची कामे ऐन पावसाळयात अपूर्णावस्थेत स्वरुपात प्रलंबित असल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरीकांना होणाऱ्या गैरसोयीचा विचार करुन निधी वाटपास दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निधी वाटपास दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) सदर शासन निर्णयांस दिलेली स्थगिती दिनांक १२ मे, २०२३ अन्वये उठविण्यात आलेली आहे.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेला (जि.पालघर) विकास कामांसाठी विशेष अनुदान मिळणेबाबत**

**(१०) ५२३६० (२०-०१-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून परिणामी जनतेला सोईसुविधा पुरविताना वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्रचंड आर्थिक ताण येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामांसाठी विशेष अनुदान देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेला विकास कामांसाठी विशेष आर्थिक अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) सन २०२२-२३/२०२३-२४ या आर्थिक वर्षात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच विकास" या योजनेअंतर्गत एकूण रु.५०.१५ कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेस विकास कामांसाठीचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) ५४२१७ (२२-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे शासकीय अनुदानातून करण्यात येत असलेल्या अनेक विकास कामाचे अनुदान नागपूर महानगरपालिकेस प्राप्त झाले नसल्याने उक्त कामे सुरू होऊनही निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय मनपा २०१९/प्रकरण क्रमांक ११४/नवी १६ दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ अन्वये रुपये १५७ कोटींची कामे मंजूर करण्यात आली असताना देखील निधी अद्यापही प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण ९ कोटी, चांदमारी येथील रस्ताच्या बांधकामासाठी ३ कोटी आणि शुक्रवारी तलाव सौंदर्यीकरणासाठी १९ कोटींचा निधी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेस विकास कामांसाठीचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), व (४) शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २०२३ अन्वये विविध विकास कामांकरीता रुपये १५७.०० कोटी व गांधीसागर तलाव सौंदर्यीकरण या कामाकरीता रु. २५.३६५० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०२३ अन्वये सक्करदरा तलाव या कामाकरीता रुपये ९.९९९५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिंनाक १२ ऑगस्ट, २०२२ अन्वये चांदमारी रोड, गिडोबा मंदिर ते बिडगाव टी पॉईंट पर्यंत रस्ता बांधकाम करणे या कामासाठी रु. ३.९१५१५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना

**(१२) ५४२४९ (२४-०१-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ऊसतोड कामगारांसाठी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळाची स्थापना सन २०१९ या कालावधीत शासनाने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करुन ग्रामसेवकांच्या माध्यमातून नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच दिवाळीनंतर राज्यात साखर कारखान्याचे हंगाम सुरु होत असताना ऊसतोड कामगारांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्राबरोबरच त्यांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सेवा सुविधा तसेच त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा करण्यासाठी शासनाने कोणती प्रक्रिया पार पाडली आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ऊसतोड कामगारांची नोंदणी करुन ग्रामसेवकांमार्फत ओळखपत्र देण्याची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. ग्रामसेवक यांनी केलेल्या ऑफलाईन नोंदणीच्या अनुषंगाने २५१२५३ इतक्या ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली असून १२६९७४ इतक्या ऊसतोड कामगारांना ओळखपत्र देण्यात आलेली आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५ जून २०२१ च्या शासन निर्णयानुसार राज्यात स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलीसाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यास व त्यानुसार मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० क्षमतेची) वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात बीड, जालना, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये खालील तालुक्यांमध्ये ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी प्रत्येक १०० क्षमतेची एकूण २० शासकीय वसतीगृहे मंजूर केलेली असून त्यातील १७ वसतीगृहे सुरू करण्यात आली आहेत. या वस्तीगृहात ४८४ मुले व ४९५ मुलींनी प्रवेश घेतलेला आहे.
(४) ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने खालील उपाययोजना केल्या/करण्यात येत आहेत.

१. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास ऊसतोड कामगार, त्यांचे कुटूंब व पाल्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणेकरीता साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रती मेट्रीक टन रु.१०/- प्रमाणे (शेतकऱ्यांना देय असणाऱ्या रास्त व किफायतशीर दरांमधून कपात न करता) ऊसतोड कामगार कल्याण निधी जमा करण्याबाबतचा दिनांक ६.१.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, अद्यापपर्यंत एकूण १७३ साखर कारखान्यांनी रुपये ३/- प्रति टन प्रमाणे साखर कारखान्यांकडून रु.३८.३२ कोटी निधी महामंडळाकडे जमा करण्यात आला आहे. या जमा रकमेच्या समप्रमाणात महामंडळास शासन स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२. केंद्रशासनाच्या एक देश एक रेशन कार्ड या योजनेंतर्गत एकूण १०८ खाजगी व ११० सहकारी साखर कारखान्यांशी संलग्न असलेले एकूण ९४६४६ ऊसतोड कामगारांचे रेशन कार्ड पोर्टेबिलीटी करुन घेणेबाबत सहाय्य करण्यात आलेले आहे.

३. राज्यातील ऊसतोड कामगारांना रोजगाराच्या ठिकाणी आरोग्य तपासणी होणेकरीता कामाच्या ठिकाणी जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने हेल्थ कॅम्प चे आयोजन करण्यात आले. एकूण १४८८२८ ऊसतोड कामगारांचे हेल्थ कॅम्प मार्फत आरोग्य तपासणी करुन त्यांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सहाय्य करण्यात आले.

४. ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांना विमा संरक्षण देणे प्रस्तावित आहे.

५. शासन निर्णय दि.२८/१०/२०२१ अन्वये ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण / नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन चे काम पुर्ण झालेले असून ते अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथे नगर विकास योजनेंअंतर्गत स्व.गोपीनाथरावजी मुंडे सभागृहाचे बांधकाम करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) ५४२५४ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथे नगर विकास योजनेंअंतर्गत स्व.गोपीनाथरावजी मुंडे सभागृहाचे बांधकाम करण्याच्या कामाला मुख्य अभियंता, बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी तांत्रिक सहमती दिली असून सदर काम प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेकरीता रु.१४९९.७९ लक्ष रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामाला प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास वरील प्रकरणी शासनाने माहिती घेऊन उक्त कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये रुपये २.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०२३ अन्वये रुपये ५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पिय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

## नाशिक महानगरपालिका अंतर्गत अपूर्ण कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ५५१५७ (२७-०१-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत अपूर्ण कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उप मुख्यमंत्री महोदयांनी ई-५४५९७८० या अन्वये कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिलेले असतांना देखील नगरविकास विभागाने सदरहू नस्ती प्रलंबित ठेवून प्रलंबित कामांना निधी दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित कामांना सत्वर निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालिकेस माहे डिसेंबर-२०२२ पासून सप्टेंबर-२०२३ पर्यंत रू. ५५.१० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**परतूर (जि. जालना) येथील नाट्यगृहाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) ५६४५९ (१९-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतूर (जि. जालना) येथील रुपये १७ कोटी किंमतीच्या नाट्यगृहाचे काम निधीअभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नाट्यगृहाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी किती दिवसात वितरीत करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये परतूर नगरपरिषदेस नाट्यगृहाचे बांधकाम करणेकरीता रु.५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

**ओझर मिग नगरपरिषद (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपरिषदेस**
**अग्निशमन सुविधांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१६) ५६६६७ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर मिग नगरपरिषद (ता.निफाड, जि.नाशिक) नव्याने स्थापन झालेली असून या नगरपरिषदेस अग्निशमन व्यवस्था व अग्निशमन स्थानक बांधकामासाठी शासन स्तरावरून अनुदान उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन नगरविकास मंत्री यांचेकडे दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओंझर मिग नगरपरिषद हद्दीत असलेली लोकसंख्या, मोठे टेक्स्टाईल मार्केट, विमान कारखाना या सर्व बाबीचा विचार करता या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा उभारण्याची नितांत आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या ठिकाणी अग्निशमन सुविधांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२३) :** (१) नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत "ड" वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपालिका यांना अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहन याकरिता शासनस्तरावरुन अनुदान मंजूर करण्यात येते.

• तसेच नव्याने स्थापन नगरपरिषदा / नगरपंचायती यांना देखील सदर अभियानांतर्गत अनुदान उपलब्ध करण्याची तरतूद करण्यात आली आहे.
• ओझर नगरपरिषदेने अग्निशम सेवेचे बळकटीकरण करणेकरिता अग्निशमन वाहन यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त केली आहे.
• प्रस्तुत योजनेंतर्गत संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांनी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्यामार्फत शासन अनुदानासाठी प्रस्ताव सादर करणे क्रमप्राप्त आहे.
• जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अग्निशमन वाहन व उपकरणे खरेदीबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर प्रस्तावाबाबत त्रुटींची पूर्तता करण्यात येत असल्याचे ओझर नगरपरिषदेने कळविले आहे.
• तसेच अग्निशमन वाहन उपलब्ध करण्याबाबत हिंदुस्तान एरोनॉटिक्स लि. नाशिक यांसकडे सादर विनंतीबाबत अद्याप प्रतिसाद मिळाला नसल्याचे ओझर नगरपरिषदेने अहवाल सादर केला आहे.
• ओझर नगरपरिषद यांनी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत अनुदान उपलब्ध करण्यासाठी विहित मार्गाने प्रस्ताव सादर केल्यास शासन अनुदान उपलब्ध करण्यात येईल.

---

## ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपरिषदेस वैशिष्टये पूर्ण कामांसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ५६६६८ (०९-०५-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपरिषदेस वैशिष्ट्ये पूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या अंतर्गत मुलभूत कामांसाठी अनुदान उपलब्ध करून देणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन नगरविकास मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने नगरपरिषदेस वैशिष्ट्ये पूर्ण कामांसाठी विशेष अनुदान अंतर्गत मुलभूत कामांसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात वैशिष्टयपुर्ण (ठोक) योजनेअंतर्गत रू. ९.४५ कोटी निधी ओझर मिग नगरपरिषदेस मंजूर करण्यात आलेला आहे.

---

## निफाड (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपंचायतीस मुलभूत कामांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

**(१८) ५६६६९ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपंचायतीस वैशिष्ट्ये पूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या अंतर्गत मुलभूत कामांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन नगरविकास मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त नगरपंचायतीस वैशिष्ट्येपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान अंतर्गत मुलभूत कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२२-२४ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत रू. ७.४० कोटी निधी निफाड नगर परिषदेस मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**राज्यातील ऊसतोड कामगार महामंडळामार्फत उसतोड कामगारांची नोंदणी व ओळखपत्र देण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत**

**(१९) ५६९२९ (२८-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगारांसाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाची स्थापना सन २०१९ या कालावधीत करण्यात आली असून महामंडळाचे कामकाज मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित असून महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांची नोंदणी व ओळखपत्र देण्याची प्रक्रिया देखील बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात ऊसतोड कामगारांच्या नोंदणीचे शासनाकडे कोणतेही रेकॉर्ड (अभिलेख्यात नोंद) उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावपातळीवर ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करुन ज्या ठिकाणी वास्तव्याला असतात तेथील ग्रामसेवकांकडून नोंदणी प्रक्रीया राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दिवाळीनंतर राज्यात साखर कारखान्याचे हंगाम सुरू होत असताना ऊसतोड कामगारांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्राबरोबरच त्यांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सेवा सुविधा तसेच त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा तसेच मजुरांच्या कायदेशीर हक्क प्रक्रीयेबाबतच्या अंमलबजावणीकरिता कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ऊसतोड कामगारांची नोंदणी करुन ओळखपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करून त्यांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

ऊसतोड कामगारांची नोंदणी करुन ग्रामसेवकांमार्फत ओळखपत्र देण्याची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. ग्रामसेवक यांनी केलेल्या ऑफलाईन नोंदणीच्या अनुषंगाने २५१२५३ इतक्या ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली असून १२६९७४ इतक्या ऊसतोड कामगारांना ओळखपत्र देण्यात आलेली आहेत.

(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५ जून २०२१ च्या शासन निर्णयानुसार राज्यात स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलीसाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यास व त्यानुसार मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० क्षमतेची) वसतिगृह सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात बीड, जालना, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये खालील तालुक्यांमध्ये ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी प्रत्येक १०० क्षमतेची एकूण २० शासकीय वसतीगृहे मंजूर केलेली असून त्यातील १७ वस्तीगृहे सुरू करण्यात आली आहेत. या वस्तीगृहात ४८४ मुले व ४९५ मुलींनी प्रवेश घेतलेला आहे.

(५) ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

१. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास ऊसतोड कामगार, त्यांचे कुटूंब व पाल्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणेकरीता साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रती मेट्रीक टन रु.१०/- प्रमाणे (शेतकऱ्यांना देय असणाऱ्या रास्त व किफायतशीर दरांमधून कपात न करता) ऊसतोड कामगार कल्याण निधी जमा करण्याबाबतचा दिनांक ६.१.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, अद्यापपर्यंत एकूण १७३ साखर कारखान्यांनी रुपये ३/- प्रति टन प्रमाणे साखर कारखान्यांकडून रु.३८.३२ कोटी निधी महामंडळाकडे जमा करण्यात आला आहे. या जमा रकमेच्या समप्रमाणात महामंडळास शासन स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२. केंद्रशासनाच्या एक देश एक रेशन कार्ड या योजनेंतर्गत एकूण १०८ खाजगी व ११० सहकारी साखर कारखान्यांशी संलग्न असलेले एकूण ९४६४६ ऊसतोड कामगारांचे रेशन कार्ड पोर्टेबिलीटी करुन घेणेबाबत सहाय्य करण्यात आलेले आहे.

३. राज्यातील ऊसतोड कामगारांना रोजगाराच्या ठिकाणी आरोग्य तपासणी होणेकरीता कामाच्या ठिकाणी जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने हेल्थ कॅम्प चे आयोजन करण्यात आले. एकूण १४८८२८ ऊसतोड कामगारांचे हेल्थ कॅम्प मार्फत आरोग्य तपासणी करुन त्यांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सहाय्य करण्यात आले.

४. ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांना विमा संरक्षण देणे प्रस्तावित आहे.

५. शासन निर्णय दि.२८/१०/२०२१ अन्वये ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण / नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन चे काम पुर्ण झालेले असून,ते अंतिम टप्प्यात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) शहरातील मुडेश्वर मैदान येथे स्टेडियम उभारणीला चालना मिळण्याबाबत

**(२०) ५९३९३ (२४-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) शहरातील मुडेश्वर मैदान येथे स्टेडियम उभारणीला चालना मिळाली असून नगरपंचायतीने स्टेडियमसाठी भूसंपादनाला सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्टेडियमसाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाला काही जमीन मालकांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच कणकवली येथील स्टेडियमसाठी सुरु असलेली भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कणकवली शहरातील मुडेश्वर मैदान येथे स्टेडियम उभारणीसाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला होता. तद् नंतर उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत संयुक्त मोजणीकामी कळविले असता त्यास जमीन मालकांनी विरोध दर्शविला आहे. उपविभागीय अधिकारी यांच्याकडून भूसंपादनाची कार्यवाही झाल्यानंतर स्टेडीयम उभारण्यासंदर्भातील पुढील कार्यवाही करण्याचे नगरपंचायतीचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसूल विभागांतर्गत ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ५९७६१ (२१-०४-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय पद भरती प्रक्रियेत सुसूत्रता नसून राज्य सरकारने जाहीर केलेल्या ७५ हजार पदांच्या भरतीच्या प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला असून विविध खात्यांमध्ये रिक्त असलेल्या वर्ग ३ आणि ४ च्या पदांची भरती महसूल विभागीय स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागीय स्तरावर भरती करण्याकरिता प्रत्येक खात्याचे प्रादेशिक नियुक्ती अधिकारी नियुक्त करून रिक्त पदांसाठी प्रत्येक महसूल विभागात स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करणे, भरती प्रक्रिया राबविण्यासाठी कंपन्यांबरोबर स्वतंत्र करार करणे आणि प्रत्येक विभागात समान पदासाठी वेगळी परीक्षा घेणे ही प्रक्रिया राबवावी लागत असून सरकारने नियुक्त केलेल्या टीसीएस व आयबीपीएस या कंपन्यांना देखील १-२ पदांसाठी संपूर्ण भरती प्रक्रिया राबविणे सदर कंपन्यासाठी त्रासदायक ठरत असल्याने ही भरती प्रक्रिया खोळंबली असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांच्या पदभरती प्रक्रियेस वेळ लागणार असल्याने महसूल विभागीय स्तरावर विविध खात्यांमधील पदे भरण्यापेक्षा प्रत्येक खात्यातील विभागीय स्तरावरील रिक्त पदांची माहिती मुख्यालयाकडून मागविण्यात यावी आणि सर्व राज्यांसाठी एकत्रित भरती प्रक्रिया राबवण्यासाठी कंपन्यांबरोबर एकत्रित करार करावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ हजार पदभरती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याअनुषंगाने पुढीलप्रमाणे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत :-

(अ) दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा पदभरतीच्या कार्यपध्दती संदर्भात दिनांक ४ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये संबंधित विभागीय आयुक्त (महसूल) यांनी संबंधित महसूल विभागाकरीता (जिल्हा परिषदा वगळून) सर्व जिल्हास्तरीय पदांकरीता परीक्षा घेण्याच्या दृष्टीने एकत्रित कार्यक्रम निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(ब) सदर पदांच्या स्पर्धापरीक्षा ऑनलाईन पध्दतीने टिसीएस-आयओएन (टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आयबीपीएस (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत घेण्यास शासन निर्णय, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(क) तसेच गट-क संवर्गातील लिपिकवर्गीय पदांपैकी लिपिक-टंकलेखकांची पदे प्रथम टप्प्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास शासन निर्णय, दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(ड) दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींसाठी कमाल वयोमर्यादेत २ वर्षाची शिथिलता दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

याअनुषंगाने, पदभरती प्रक्रियेअंतर्गत २५,२५६ पदांवरती नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच १,५३,६४० पदांची भरतीप्रक्रिया सुरु झाली असून, यामधील ३३,३६३ पदांवर नियुक्ती देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात सुरु आहे.

अशाप्रकारे प्रशासकीय विभागांकडून पदभरतीची कार्यवाही सुरु असून प्रकिया खोळंबलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील वैशिष्टपूर्ण व नाविण्यपुर्ण योजनांना शासनाकडून दिलेली स्थगिती उठविण्याबाबत

**(२२) ६०३७० (२४-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील सावनेर, मोहपा, कळमेश्वर व खापा नगरपरिषद येथे वैशिष्टपुर्ण योजना, नाविण्यपुर्ण योजनेसह विविध योजनेअंतर्गत सन २०२१ ते माहे जुन, २०२२ पर्यत विविध विकास कामांना शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व कामांना सदर नगरपरिषद/नगरपंचायत व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभिड, जिल्हा चंद्रपूर यांच्या वतीने उपरोक्त कामांचे प्रस्ताव, अंदाजपत्रक, निविदा तयार करण्याची प्रक्रिया सूरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रिया सुरु असतानाच सदर प्रक्रियांना स्थगिती देण्यात आली असून स्थगिती मुळे सदर कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामांची तातडी आणि आवश्यकता लक्षात घेता दिलेली स्थगिती तात्काळ उठवून कामे तात्काळ पुन्हा सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) कळमेश्वर नगरपरिषदेच्या कामाचे शासन निर्णय क्र.नपावै-२०२२/ प्र.क्र. १००-अ(०२)/नवि-१६, व खापा नगरपरिषदेच्या कामाचे शासन निर्णय क्र.रस्ताअ-२०२२/ प्र.क्र. ९८-ब(११-अ)(१)/नवि-१६, अन्वये स्थगिती उठविण्यात आली आहे.

नगरपरिषदेच्या कामांना दिलेली स्थगिती उठविण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## कोल्हापूर शहरातील गांधी मैदानाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी मिळण्याबाबत

**(२३) ६०७२१ (२४-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील गांधी मैदानाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी सुमारे १८ कोटी रुपयाच्या विकास निधी मंजुर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मैदानाच्या परिसराचा कायापालट व विकास करणे व खेळाडुंना / क्रिडा प्रेमींना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सुमारे १९ कोटी रुपयांचा (आराखडा) स्थानिक प्रशासन यांच्याकडे तयार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निधीची तरतूद करुन गांधी मैदानाच्या विकासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) गांधी मैदाना लगत स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज व क्रॉसड्रेनेज तसेच इतर कामासाठी दि.२३.३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये रू.५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

**परभणी महानगरपालिकेंतर्गत नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकासकामांना मान्यता देण्याबाबत**

**(२४) ६१५०० (२४-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेंतर्गत १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना सन २०१८ मध्ये मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी सदर नाट्यगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नवीन नाट्यगृह बांधकामासाठी वाढीव ११ कोटी निधीस मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

**कल्याण पुर्वेतील पुनालिंक रोडवरील बगीच्यासाठी आरक्षित असलेल्या**
**आरक्षण क्र. ४९९ भूखंडावरील अनधिकृत मोबाईल टॉवरबाबत**

**(२५) ६१९४३ (११-०५-२०२३). श्री. गणपत काळू गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. कुमार उत्तमचंद आयलानी (उल्हासनगर), डॉ. बालाजी प्रल्हाद किणीकर (अंबरनाथ), श्री. किसन शंकर कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथील पुनालिंक रस्त्यावरील बगीच्यासाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र.४९९ भूखंडावर A.T.C. टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीचे अनधिकृतपणे मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधीनी वारंवार तक्रारी करून सदर भूखंडावरिल मोबाईल टॉवर हटविण्याबाबत व सदर भूखंड ताब्यात घेऊन लोकपयोगी बगीचा त्वरित जनतेसाठी उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार निवेदने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरक्षण क्र.४९९ वरील आरक्षित जागेवर कारवाई करताना सर्वसामान्य गरीब नागरिकांची घरे, दुकाने, टपऱ्या यांच्यावर कारवाई करण्यात आलेली असुन राजकीय पाठींबा असलेल्या नागरिकांच्या अनधिकृत बांधकामावर कोणत्याही प्रकारे कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने सदर आरक्षित जागा ताब्यात घेऊन अनधिकृत मोबाईल टॉवर उभारणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर मोबाईल टॉवर दि.०५.०१.२०२२ रोजी अनधिकृत घोषित करून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

• आरक्षित जागा अद्याप महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नाही.

• सद्य:स्थिती आरक्षित जागेवरील अतिक्रमणावर कारवाई झालेली असून, सदर मोबाईल टॉवर संबंधित कंपनीने काढून घेतला आहे.

---

**औसा (जि.लातूर) शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागातील मुलभूत विकास कामासाठी निधी मंजुरीबाबत**

**(२६) ६३५९५ (१२-०५-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) नगरपरिषद हद्दवाढ करण्यात आली असून सदरील हद्दवाढी अंतर्गत नवीन समाविष्ट भागात मुलभूत विकास कामे करण्यासाठी विशेष निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे माहे जानेवारी-फेब्रुवारी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरील निधी मंजुरीबाबत व हद्दवाढीत समाविष्ट भागात मुलभूत कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात औसा नगरपरिषदेस वैशिष्टयपुर्ण / रस्ता अनुदान या योजनेअंतर्गत रू.१९ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

---

**चंद्रपूर महानगरपालिकेच्या पाणी पूरवठा योजनेमधून नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) ६३७०१ (१२-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरासाठी केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा २५ व चंद्रपूर महानगरपालिकेचा २५ टक्के वाटा या प्रमाणे २३५ कोटीची अमृत पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आलेली असून २०१९ पर्यत ही योजना पुर्ण करणे अपेक्षित होत मात्र अद्यापही ही योजना पुर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर शहारातील नागरिकांना ३६५ दिवसापैकी १५० दिवस अशुध्द व अपूरा पाणी पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर शहरातील नागरिकांना शुध्दा पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी व सदर योजना पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत बहुतांशी कामे पूर्ण झालेली आहेत. योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहे. टप्याटप्याने झोनचा पाणी पुरवठा सुरु करण्यात येत आहे.

(२), (३), (४) व (५) चंद्रपूर शहरात शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही याकरिता दर एक दिवसाआड शहरातील विविध झोनमधील सरासरी २४ ठिकाणचे पाण्याचे नमुने घेवून जिल्हा प्रयोग शाळा शाळेकडे तपासणीकरिता पाठविण्यात येत असून सदरील नमुने पिण्यास योग्य आढळून आलेले आहेत. शहरातील वाढलेली लोकसंख्या पाहता काही भागात एका दिवसाआड शुद्ध पाण्याचा पुरवठा केला जातो.

सदर प्रकल्पाकरिता वन विभाग, महाऔष्णिक विद्युत केंद्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग अशा विविध विभागांच्या परवानग्या मिळण्यास विलंब तसेच, कोव्हीड महामारीमुळे उद्धवलेल्या परिस्थितीमुळे कामाच्या गतीवर परिणाम झाला. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम ९५ % पूर्ण झालेले असून योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहे तसेच, टप्याटप्याने झोनचा पाणी पुरवठा सुरु करण्यात येत आहे असे चंद्रपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका हद्दीतील**
**रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याबाबत**

**(२८) ६४५५९ (०७-०६-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका हद्दीतील आग्रा रोडवरील देवाजी नगर रोड ते धामणकर नाका कोहिनूर डाईंग पर्यंतचा रस्ता वाहतुकीकरिता छोटा असल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होत असून वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी व रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ व दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२) व (३) अंजूरफाटा ते धामणकरनाका हा रस्ता ३६ मी रूंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच भंडारी कंपाऊंड येथील श्रीकर डाईंग येथे जाणा-या रस्त्यास रु.५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**येवला (जि.नाशिक) शहराच्या मलनि:स्सारण प्रकल्पास**
**सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(२९) ६४८७० (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानामधून येवला (जि.नाशिक) शहराच्या मलनि:स्सारण प्रकल्पास चालू दरसूचीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी मुख्य अभियंता मजीप्रा नाशिक यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी सुधारित तांत्रिक मंजुरी घेवून दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी येवला नगरपरिषदेने शासनाला प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ मे, २०२३ व दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर येवला शहर मलनिःस्सारण प्रकल्पास चालू दरसूचीनुसार अनुसरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अनुसरून सदर प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या अनुषंगाने निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

सदर निवेदन व त्यासोबतची कागदपत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयास पाठविण्यात आले असून नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत सदर प्रस्तावाची छाननी करून याबाबतचा प्रस्ताव विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

## खोपोली नगरपरिषदेच्या (ता.खालापूर, जि.रायगड) हद्दीतील विविध तक्रारी व समस्या असल्याबाबत व त्या सोडविण्याबाबत

**(३०) ६४९५८ (२२-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली नगरपरिषदेच्या (ता.खालापूर, जि.रायगड) हद्दीतील विविध तक्रारी व समस्या असल्याबाबत व त्या सोडविण्याबाबत रायगड प्रेस क्लबच्या वतीने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद यांचेकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या तक्रारींचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान रायगड प्रेस क्लबच्या वतीने नगरपरिषदेकडे कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याचे नगरपरिषदेच्या दैनिक अहवाल नोंदवही तपासणीअंती दिसून येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील गोदावरीसह वाघाडी, नंदिनी व वालदेवी या उपनद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(३१) ६५०३६ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील गोदावरीसह वाघाडी, नंदिनी व वालदेवी या उपनद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी कृती योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालिकेने चार मल:निस्सारण केंद्रांच्या क्षमतावाढीसाठी ५३० कोटी रुपयांचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशात दक्षिण काशी म्हणून नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदी ओळखली जात असून, या नदीच्या कडेला कचराडेपो असल्यामुळे व शहरातील घाणपाणी या नदीपात्रात सोडलेले असल्यामुळे या नदीची अवस्था दयनिय झाली असून मोठया प्रमाणात प्रदुषण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरातील गोदावरी नदीसह तिच्या उपनद्या आणि ६७ नाल्यांचे प्रदूषण कमी करण्याची नाशिक महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये आयआयटी पवई ला सर्वेक्षण करण्याचे काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोदावरी नदी आणि तिच्या उपनद्यांचे प्रदूषण कमी करून पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने नमामी गोदा प्रकल्पा अंतर्गतसुद्धा शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी अहवाल प्राप्त करून नाशिक शहरातील गोदावरी नदी, तिच्या उपनद्या आणि ६७ नाल्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२३) :** (१) होय, सुधारित प्रकल्प अहवाल दि. ११.११.२०२२ रोजी मनपा कडून केंद्र शासनास मंजुरीसाठी फेर सादर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी गोदा प्रकल्प राबविणेसाठी नाशिक महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणुक केली आहे. सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत सल्लागार यांनी

सिंहस्थाचे दृष्टिने महत्त्वाचे कामांचे Block Estimate सादर केले आहे. सदर कामांचे सविस्तर Detail Estimate लवकरच सादर करण्यात येणार आहे.

तसेच पुढील चार ते पाच महिन्यात सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मान्यतेसाठी राज्य शासनामार्फत केंद्रशासनास सादर करण्याचे नियोजन आहे.

(५) गोदावरी नदीत प्रदुषण होऊ नये व त्याचे सनियंत्रण करणेसाठी मनपाने स्वतंत्र गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन केला आहे. नदी कायम स्वच्छ राहण्यासाठी दैनंदिन स्वच्छता करण्यात येत आहे. सदय:स्थितीत नाशिक मनपाच्या पंचवटी,पश्चिम,सातपुर,नाशिकरोड व पुर्व विभागातील उपलब्ध सफाई कर्मचाऱ्यांमार्फत त्यांचे कार्यक्षेत्रातील नदीपात्राची व घाटाची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. गोदावरी व उपनदयांचे प्रदुषण होऊ नये म्हणुन वेगवेगळया पद्धतीने नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत आहे.तसेच नदीपात्रात प्रदुषण करणारे नागरिकांना दंड करण्यात येत आहे.याबाबत नागरिकांना माहिती व्हावी म्हणून मनपाच्या संकेतस्थळावर व्यवस्था करण्यात करण्यात आली आहे. तसेच गोदावरी व उपनदयांच्या प्रदुषणाबाबत नागरीकांना मनपाकडे तक्रार करता यावी याकरिता nmc e-connect App मध्ये व्यवस्था करण्यात आली असून त्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींचे नियमितपणे निराकरण करण्यात येते. नाशिक महानगरपालिका हद्दीत गोदावरी नदी पात्रात वाढलेल्या पाणवेली Trash Skimmer ने वेळोवेळी काढण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक ) शहरातील नवीन बसस्थानक भागातील प्रलंबित उड्डाण पुलाच्या कामाबाबत

**(३२) ६५९८४ (२८-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील नवीन बसस्थानकाच्या भागातील उड्डाणपुलाचे काम गत आठ ते दहा वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलामुळे दोन्ही बाजुचा रस्ता अरुंद झाल्यामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उड्डाणपुलाखाली मोठया प्रमाणात अवैध वाहन पार्किंग होत असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त उड्डाणपुलाचे प्रलंबित काम पुर्ण करुन वाहतूक कोंडी सुरळित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मालेगाव शहरात उड्डाण पुल उभारण्याच्या रुपये २१.७२ कोटी किंमतीच्या प्रकल्पास दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम ९० % पूर्ण झाले असून पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

(२) सदरील पुलाचे दोन्ही बाजूने ७.५-७.५ मी. रस्त्याची रुंदी असून सर्व्हीस रोड असून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्याप्त रुंदीचा रस्ता वापरात आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदरील ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहन पार्किंग होत आहे. सदरील ठिकाणी वाहन पार्क करण्यात येऊ नये यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच, पुलाच्या खालील मोकळया जागेत बगीचा विकसित करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन असून त्यामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघणार आहे.

(४) व (५) सदरील प्रकल्पाचे काम सुरु असताना कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे माहे एप्रिल, २०२० ते जुलै, २०२१ पर्यंत काम बंद असणे, वीज वितरण कंपनीकडून पुलाच्या कामात अडथळा ठरणारे विद्युत पोल व वाहिन्या स्थलांतरित करणेकरिता अतिशय कमी वेळेचा मिळणारा शट डाऊन, स्थानिक नागरिकांची पुलाच्या लांबीत वाढ करण्याची मागणी, सदर रस्त्यावर शहराचे मध्यवर्ती बस स्थानक असल्याने बस फेऱ्या अन्य बस स्थानकावर स्थलांतरित करणे अशा विविध कारणांमुळे कामास विलंब झालेला आहे.

सदर प्रकल्पाच्या कामास होत असलेल्या विलंबास अनुसरून मालेगाव महानगरपालिकेने संबंधित कंत्राटदाराकडून चौथ्या देयकामधून रुपये २५,०००/- इतका दंड वसूल केला आहे. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम ९० % पूर्ण झाले असून पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

---

## मालेगांव (जि.नाशिक) शहरातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतंर्गत कामांची निविदा प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ६५९९० (२५-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतंर्गत मनपा क्षेत्रातील ५१ कामांना मंजूर मिळूनही कामांची निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची निविदा प्रक्रिया प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कामाची निविदा प्रक्रिया तात्काळ न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) मालेगांव महानगरपालिकेतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी ५० कामांना व महानगरपालिका निधीतून एक अशा एकूण ५१ कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर मंजूर ५१ कामातील ३९ (नगरोत्थान अंतर्गत ३८ व मनपा निधीतील १) कामांचे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले असून करारनामा व कार्यादेश करिता ५ कामांची कार्यवाही सुरु आहे तसेच, ५ कामांची निविदा मंजुरीची कार्यवाही सुरु असून उर्वरित दोन कामांचे दरपत्रक उघडणे प्रलंबित आहे.

प्रस्तुत कामांची निविदा प्रक्रिया जानेवारी, २०२३ मध्ये पदवीधर विधानपरिषद सदस्य निवडणुकीची आचारसंहिता सुरु असल्याने सदरील कालावधीत निविदा मंजुरी होऊ शकली नाही. सदरील मंजूर कामांच्या निविदेची व अनुषंगिक कार्यवाही सुरु असून याबाबत वेळोवेळी जिल्हास्तरावर अहवाल घेण्यात येत असल्याचे आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

## सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) शहरात मोठया प्रमाणात पाणी टंचाई होत असल्याबाबत

**(३४) ६६०८२ (२५-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) शहरातील कुणकेरी येथील पाळणेकोंड धरणात मुबलक पाणी असूनही केवळ नियोजनाच्या अभावामुळे शहरात मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील सबनीसवाडा येथील काही भाग, उभा बाजार, सर्वोदय नगर, शिल्पग्राम परिसर, भटवाडी परिसर, गरड आदि भागात सध्या पाणीटंचाई निर्माण झाली असून नळाला पुरेसे पाणी येत नसल्याने नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सावंतवाडी शहराला पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सावंतवाडी शहराला पाळणेकोंड धरण व केसरी बंधाऱ्यावरुन पाणी पुरवठा केला जात असून ही योजना गुरुत्वाकर्षणावर आधारीत आहे. पाळणेकोंड धरणातून ३ एम.एल.डी. व केसरी बंधाऱ्यातून ०.५ एम.एल.डी. इतका पाणी पुरवठा सावंतवाडी शाहराला केला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात अमृत पाणीपुरवठा योजनेसाठी महानगरात पाईपलाईन टाकण्यात आली असून देखील नळजोडणी न केल्याबाबत

**(३५) ६६२५९ (२५-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात अमृत पाणीपुरवठा योजनेसाठी महानगरात पाईपलाईन टाकण्यात आली असून अद्यापही येथील अनेक भागात नळ जोडणी करण्यास संबंधित कंत्राटदाराने दुर्लक्ष केले असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असाच प्रकार तुकूम परिसरातील सिव्हील वार्ड क्र.२ मधील हजारे स्वस्त धान्य दुकानासमोरील गल्लीत कंत्राटदाराने नळ जोडणी करण्यास दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिणामी मागील तीन महिन्यांपासून पाणी मिळत नसल्याने येथील महिलांना इतरत्र ठिकाणावरुन पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने नळजोडणी करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी येथील स्थानिक नागरीक करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूर प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पातील बहुतांशी कामे पूर्ण झालेली असून योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत असून टप्याटप्याने झोनचा पाणीपुरवठा सुरु करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत शहरात ५५० किमी पाईपलाईन अंथरण्यात आले असून ६०,५३० नवीन नळजोडणी करण्यात आलेल्या आहेत. शहरातील तुकूम परिसरातील सिव्हील वार्ड क्र. २ मधील हजारे स्वस्त धान्य दुकानासमोर गल्लीत नळ जोडणी करण्यात आलेली असून त्या भागात नवीन योजनेंतर्गत सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे.

---

## मिरज व कोपवाडा (जि.सांगली) शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

**(३६) ६६९७४ (२७-०८-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज व कोपवाडा (जि.सांगली) शहरातील वाहतूक समस्येला कारणीभूत असलेला दोष दूर करण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करून पोलीस अधिक्षक कार्यालयाने महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मागील ३ महिन्यापूर्वी त्याबाबत माहिती देवूनही अदयाप वाहतूक कोंडी सोडविण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सदरहू ठिकाणी वारंवार अपघात होत असल्यामुळे प्रवाशांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी होत असलेली वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१२-२०२३) :** (१) पोलीस अधिक्षक, सांगली यांनी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील विविध रस्त्यांवरील उपाययोजनांबाबत सूचना दिलेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पोलीस अधिक्षक, सांगली यांनी सुचविलेल्या उपायायोजना विचारात घेऊन, जिल्हाधिकारी, सांगली यांनी जिल्हा रस्ता सुरक्षा बैठकीत रस्त्यावरील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी सिग्नल यंत्रणा बसविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वाहतुक सिग्नल यंत्रणेचे अंदाजपत्रक तयार करुन निधीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे मागणी करण्यात येत आहे. शहरातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक उपायोजना महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर विद्यापीठास लागुन केगांव येथील बहुउद्देशीय जलसिंचन तथा पर्यटन स्थळ म्हणून तलावाचे संवर्धनास अमृत सरोवर योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) ६७५६१ (२४-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्यापीठास लागुण केगांव येथील गट क्रमांक २६,२७ व २८ आरक्षण क्रमांक ११/१९ मध्ये बहुउद्देशीय जलसिंचन तथा पर्यटन स्थळ म्हणून तलावाचे संवर्धनास अमृत सरोवर योजनेतर्गत निधी उपलब्ध होणे बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदयांना माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेवर अस्तित्वातील पाझर तलावाचे संवर्धनास पर्यटन विकास व पर्यावरणीय संगोपन हेतुने सुधारणा करणेसाठीचे नियोजन असलेने त्यासाठी निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचा विकास व सुधारणा केल्यास शहराच्या सौदर्यांत भर पडून पर्यटकांची वर्दळ वाढून काही अंशी रोजेदारी उपलब्ध होऊ शकत असल्याने या प्रकल्पास महानगरपालिकेच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील केगाव येथील आरक्षण क्रमांक ११/१९ मधील जागेत पिकनिक ठिकाण विकसित करणेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान

महाभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०२१-२२ अंतर्गत रुपये १.४२ कोटी किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे कामे प्रगतीपथावर आहेत.

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत सोलापूर महानगरपालिकेने केगाव तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रकल्पाची मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस केलेली असून केंद्र शासनाच्या अंतिम मान्यतेनंतर सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## नाशिक जिल्हयातील गंगापूर धरणापासून मोतीवाला कॉलेज जवळील जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३८) ६७६५५ (२७-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील गंगापूर धरणातून पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी मोतीवाला कॉलेज, पाईपलाईन रोड, येथील उजव्या कॅनॉलची जागा नाशिक महानगरपालिकेला दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले असून झोपडपट्ट्या व इतर पक्की बांधकामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही अतिक्रमीत बांधकामे त्वरीत निष्काषीत करण्याबाबत जलसंपदा विभागाने महानगरपालिका, नाशिक यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर कालव्याच्या दोन्ही बाजूस शासकीय संपादीत जागेमध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले असून मनपाच्या अतिक्रमण विभागाचे अभिप्रायानुसार सदर कालव्याच्या जागेचे सिमांकन केल्यानंतर अतिक्रमण दर्शविणारा नकाशा तसेच अतिक्रमीत इमले चिन्हांकित केल्यानंतर त्या जागेवरील अतिक्रमण काढण्याबाबत निष्काषणाची कार्यवाही नाशिक मनपा मार्फत करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेबाबत

**(३९) ६८०७७ (३१-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील पाणीपुरवठा योजना संपुष्टात आली असून, नव्या पाणीपुरवठा योजनेलाही केंद्र शासनाकडे रुपये ७७०.६८ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव पाठवलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये नवीन जलवाहिनी, शुध्दीकरण केंद्र जलकुंभाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने माहिती घेवून सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :**(१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत अमरावती शहराचा रुपये ९८५.४९ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रकल्पाची मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस केलेली असून केंद्र शासनाच्या अंतिम मान्यतेनंतर सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**भिवंडी शहरातील (जि.ठाणे) वन्हाळदेवी तलावाचे पुनरुजीवन व सुशोभिकरण प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत**

**(४०) ६८४०० (२७-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने वन्हाळदेवी तलावाचे जलसाठ्याचे पुनरूज्जीवन व सुशोभीकरण केंद्र पुरस्कृत अमृत सरोवर २० अभियान अंतर्गत करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या अमृत २.० वेब पोर्टलवर ५२.९५ कोटी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीची (SLTC) मान्यता देण्यात येऊन केंद्र शासनास सादर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांस दिनांक २३ मे २०२३ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीची (SLTC) अद्याप पर्यंत मान्यता देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाच्या राज्य स्तरीय तांत्रिक समितीची (SLTC) मान्यता देऊन सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाची दिनांक १४ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या वन्हाळदेवी तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाचा रुपये ५३ कोटी किंमतीचा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकल्प मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर करण्यात आला होता तथापि, केंद्र शासनाकडून अमृत २.० अभियानांतर्गत सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेमुळे भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या वन्हाळदेवी तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाची केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस करण्यात आलेली नाही.

---

**दौंड (जि. पुणे) येथे उप प्रादेशिक मोटर परिवहन कार्यालयाचे (RTO) आठवडा शिबीर नियमित सुरु करणेबाबत**

**(४१) ६८७३७ (३१-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती व इंदापूर या तीन तालुक्यासाठी बारामती या ठिकाणी एकच उप प्रादेशिक मोटर परिवहन कार्यालय (RTO) असल्यामुळे दौंड मतदार संघातील वाहन धारकांना RTO परवाना मिळवण्यासाठी बारामती येथे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दौंड ते बारामती ७० ते ८० किमी असल्याने वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत

असल्याने RTO कार्यालयाकडून प्रत्येक आठवड्याला घेण्यात येणारे शिबीर नियमित घेण्यात यावे अशी मागणी वाहन धारकांकडून तसेच, मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त शिबीर नियमित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्या अहवालानुसार दि. २५.१०.२०२३ पासून दर बुधवारी दौंड, जि. पुणे येथे शिबीर कार्यालय सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) येथील नगरपरिषद इमारत बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४२) ६८७३८ (२४-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथील नगरपरिषद इमारत बांधकामासाठी निधी मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारतीच्या बंधकामासाठी सुमारे ३६ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०१-२०२४) :** (१), (२), (३), व (४) सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

**वणी ते नांदेपेरा (ता.वणी, जि.यवतमाळ) रा.मा.१३७ वर**
**नोंदणीक्षमतेपेक्षा जड वाहतुक होत असल्याबाबत**

**(४३) ६८८४१ (३१-०८-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी ते नांदेपेरा (ता.वणी, जि.यवतमाळ) रा.मा.३१७ मार्गावर होणारी जड वाहतुक वाहनाच्या नोंदणीकृत भारक्षमतेपेक्षा कमी किंवा नोंदणीकृत भारक्षमतेएवढी होत असल्याचे निदर्शनास आले असून सदर मार्गाची रुंदी ३.७० मीटर इतकी असून सदर मार्गावरुन जड माल वाहतूक करणारी वाहने प्रवास करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सदर मार्गावर खूप जास्त खडे पडलेले असून हलकी मोटार वाहने व मोटार सायकल वाहनधारकांना प्रवास करणे धोकादायक असू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर मार्गाने होणारी जड माल वाहतुक ही खैरी वडकी करंजी मारेगांव वणी या राष्ट्रीय महामार्गाने वळविण्यात यावी असे प्रत्यक्षदर्शी अभिप्राय देण्यात आलेला असून मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यवतमाळ यांचे दि.१०/१०/२०२२ या आदेशाव्दारे, दिनांक १२/१०/२०२२ पासून ते पुढील आदेशापर्यंत वणी ते नांदेपेरा रोड वरील होणारी जड वाहतुकीस बंद करुन खैरी-वडकी-करंजी-मारेगांव – वणी या मार्गाने जडवाहतुकीस योग्य असल्याने रोडला वळविण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे, हे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मार्गावर कोळशाची जड वाहतुक सुरुच असून महाराष्ट्र मुंबई कायदा १९५१ चे कलम १३१ अन्वये नियमाची पायमल्ली करणाऱ्या ट्रकमालक व चालकांची शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक १०.१०.२०२२ रोजी मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११५ अन्वये आदेश पारित केले आहेत. सदर आदेशान्वये वणी ते नांदेपेरा या रस्त्यावरील जड वाहतूक बंद करून खैरी-वडकी-करंजी-मारेगाव- वणी या मार्गाने दिनांक १२.१०.२०२२ रोजीपासून पुढील आदेशापर्यंत वळविण्यात आली आहे.
(४) वाहतूक नियंत्रण उपशाखा वणी, जि. यवतमाळ यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १०.१०.२०२२ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येत असून वणी ते नांदेपेरा रस्त्यावर तपासणी केली असता जड वाहतूक होत असल्याचे आढळून आले नाही.
तसेच, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांच्या वायुवेग पथकाकडून तपासणी केली असता सदर रस्त्यावर भार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक होत असल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे महानगरपालिकेच्या गैरकारभाराबाबत कार्यवाही करण्याबाबत

**(४४) ६९३४२ (०३-०९-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महानगरपालिकेच्या अनियमित, बेजबाबदार व गैरकारभाराच्या कार्यपद्धतीबाबत प्राप्त नागरिकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांना वारंवार पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने नगर विकास-२५ या कक्षाने आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांना अहवाल सादर करण्याचे अनेक लेखी निर्देशपत्र पाठवले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आणि नगर विकास-२५ कक्षाचे निर्देश पत्र यासंदर्भात आयुक्त, महानगरपालिका, धुळे यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याने, कर्तव्यात कसून करणाऱ्या आयुक्त, महानगरपालिका धुळे यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या वारंवार पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने वेळोवेळी दखल घेवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे जिल्हाधिकारी व मा. आमदार महोदय यांचेकडे सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा बुलढाणा येथील नांदुरा व मलकापूर शहराचे वाढीव पाणीपुरवठा योजनेकरीता अमृत २.० योजनेअंतर्गत कामे मंजूर करण्याबाबत

**(४५) ६९४८१ (०३-०९-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा व मलकापूर नगरपालिका मध्ये शहराचे वाढीव पाणीपुरवठा योजनेकरता अमृत २.० योजनेअंतर्गत निधी मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदन देऊन सहा महिन्याचा कालावधी उलटून सुद्धा अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदुरा व मलकापूर शहराचे वाढीव पाणीपुरवठा योजने करता अमृत २.० योजनेअंतर्गत निधी मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा व मलकापूर नगरपालिका यांना केंद्र पुरस्कृत २.० अभियानांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मा. लोकप्रतिनिधीनी केली आहे.
(२), (३) व (४) मलकापूर व नांदुरा नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकल्प अमृत २.० SWAP-II अंतर्गत मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर करण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाकडून अमृत २.० अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेमुळे मलकापूर व नांदुरा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पांची केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस करण्यात आलेली नाही.

---

## नांदुरा नगरपरिषद (जि.बुलढाणा) मधील हद्दवाढ झालेल्या भागाचा विकास करण्याबाबत

**(४६) ६९४८३ (२७-०८-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा नगरपरिषद मधील हद्द वाढ झालेल्या भागाचा विकास करण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देणे बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ पासून नगरपरिषद नांदुरा यांनी हद्दवाढ झालेल्या विभागाचा विकास करणे बाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे सादर केलेला असून अद्याप पर्यंत निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हद्दवाढ झालेल्या भागातील नागरिकांच्या मूलभूत सोयी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०१-२०२४) :** (१), (२), (३), व (४) सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

## मालवण (जि. सिंधुदुर्ग) महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेला भुयारी गटार योजना प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४७) ६९६५६ (३१-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि. सिंधुदुर्ग) महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेला भुयारी गटार योजना हा महत्वकांक्षी प्रकल्प तब्बल १४ वर्षे उलटून गेली तरी अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे काम पूर्ण होण्यास एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत तसेच सदर योजनेवर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उक्त योजनेचे काम पूर्ण होण्यास अजून किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत मालवण शहराच्या भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

मालवण शहराची भौगोलिक रचना व समुद्र किनाऱ्यालगत असलेली भूजल पातळी यामुळे प्रस्तुत प्रकल्पातील तांत्रिक बदल, अतिवृष्टी, पावसाळा, कोव्हीड-१९ मधील निर्बंध, प्रकल्पात आवश्यक मशिनरी, साहित्य यांची विहित वेळेत उपलब्ध न होणे इ. अशा कारणांमुळे सदर प्रकल्पाची कामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. सदर प्रकल्पावर आजमितीस रुपये २४.०८ कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला असून प्रकल्पाचे काम माहे मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्याधिकारी, मालवण नगरपरिषद यांनी कळविले आहे. तसेच, सदर प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा शासन स्तरावरून घेऊन आवश्यक सूचना संबंधितांना देण्यात आलेली आहेत.

---

## अहमदपूर (जि.लातूर) शहरातील महाराष्ट्र स्वर्ण जयंती नगरोत्थान अभियांनांतर्गत केलेल्या कामाचे लेखापरिक्षण करण्याबाबत

**(४८) ७००९८ (३१-०८-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरातील महाराष्ट्र स्वर्ण जयंती नगरोत्थान अभियांनांतर्गत शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(२) असल्यास, या योजनेच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली व यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे या योजनेचे लेखापरिक्षण करुन चौकशी करण्याची मागणी एका माजी नगरसेवकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच या योजनेचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत अहमदपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पातील सर्व उपांगांची कामे पूर्ण झालेली असून सदर प्रकल्पाद्वारे जानेवारी, २०२१ पासून पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.
(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत अहमदपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २ मार्च, २०१७ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली होती. सदर प्रकल्पाचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. सदर प्रकल्पावर आजमितीस रुपये ४२.५२३१ कोटी खर्च झालेला आहे.
(३), (४) व (५) अहमदपूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाचे पर्यवेक्षण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार असलेल्या शासकीय यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आलेले आहे.

सदरील योजनेच्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण हे श्री. गुरु गोविंद सिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या शासकीय संस्थेमार्फत करण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पाचे काम संथ गतीने केल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रस्तावित केल्याप्रमाणे कंत्राटदाराविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली असून आतापर्यंत रुपये १८.६९ लक्ष इतकी रक्कम दंडापोटी कपात करण्यात आलेली आहे.

सदरील योजनेची कामे सुरु असताना शासन स्तरावरून, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या स्तरावरून वेळोवेळी आढावा घेण्यात आलेला असून प्रकल्पातील सर्व कामे पूर्ण करून घेण्यात आलेली आहेत.

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील प्रसिद्ध वऱ्हाळदेवी मंदिर व दिवाण शहा दर्गा या दोन्ही पवित्रस्थळांना तीर्थस्थळांचा दर्जा देण्याबाबत

**(४९) ७०८७६ (३१-०८-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील प्रसिद्ध वऱ्हाळदेवी मंदिर व दिवाण शहा दर्गा या दोन्ही पवित्रस्थळांना तीर्थस्थळांचा दर्जा देण्याची मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येत असल्याची बाब दिनांक माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरातील प्रसिद्ध वऱ्हाळदेवी तलाव व परिसर सौंदर्यीकरण तसेच नवीन बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वऱ्हाळदेवी मंदिर व दिवाण शहा दर्गा या दोन्ही स्थळांना तीर्थ क्षेत्र दर्जा देणेबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री महोदय व मा. मंत्री, राज्य उत्पादन शुल्क तथा ठाणे मा. पालकमंत्री, जि. ठाणे यांच्याकडे केलेली आहे.

(२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या वन्हाळदेवी तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकल्प मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर करण्यात आला होता तथापि, केंद्र शासनाकडून अमृत २.० अभियानांतर्गत सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेमुळे भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाची केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस करण्यात आलेली नाही.

---

## बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी वर्गाकडून सातत्याने अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(५०) ७१४५८ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड विधानसभा मतदार संघामध्ये परिवहन विभागाचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड या नावाने कार्यरत आहे. या कार्यालयातील परिवहन अधिकारी श्री.स्वप्निल माने, मोटार वाहन निरीक्षक श्री.गणेश विघ्ने, श्री.बिराजदार प्रदिपकुमार, श्री.संतोष जाधव व त्यांच्यासमवेत असलेले काही अधिकारी यांनी अनियमितता व गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मतदार संघामध्ये या कार्यालयाकडून मोठ्या प्रमाणावर गैरकारभार होत असल्यामुळे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आपल्या व संबंधित कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु आजतागायत त्या पत्राचे अनुपालन अथवा रितसर चौकशी होऊ शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून बीडमधून व बीडच्या बाहेरून जात असलेला राष्ट्रीय महामार्ग नवीन क्र.५२ वर सर्व प्रकारच्या वाहनधारकांकडून दमदाटी करुन नियमात बसणार नाही अशा स्वरुपाची पैशाची मागणी करत आहेत. ती मागणी पूर्ण न झाल्यास अवाजवी तात्काळ दंड आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिक व वाहनधारकांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत, तसेच मतदार संघातील व जिल्ह्यातील वाहनधारकांकडून या कार्यालयाने आर्थिक हप्तेखोरीसाठी त्रयस्त माणसाची नेमणूक केलेली आहे व त्याच्याद्वारे हप्तेखोरी होत आहे अशी तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त सर्व बाबींची संचिकानिहाय, दैनंदिनीनिहाय उच्चस्तरीय चौकशीची त्रयस्त समितीमार्फत व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून व्हावी अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२३) :** (१) नाही.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे मेलव्दारे तक्रार केली असून सदर कार्यालयाने तक्रारीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांची चौकशी करुन तहसिलदार, सामान्य विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना अहवाल सादर केलेला आहे.
(३) व (४) नाही.
(५) व (६) अशा स्वरुपाची तक्रार परिवहन आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकरणी प्राप्त अहवालानुसार, प्रादेशिक परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व महालेखापाल कार्यालय, नागपूर यांच्या पथकाने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड या कार्यालयाचे लेखापरिक्षण केले असता, सदर अधिकाऱ्यांनी कोणतीही अनियमितता केल्याचे आढळून आलेले नाही.

तसेच या प्रकरणी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना या प्रकरणी जलदगतीने तपास करुन अहवाल शासनास करणेबाबत दि. ०५ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.